सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.स्थासंक/८/काअ/१९६
स्थनिक संस्था कर कार्यालय,
सोलापूर. दि.३.६.२०१५

## -: जाहीर प्रसिध्दीकरण :-

मा.महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम-२०१५ (सुधारीत) मधील नियम ४८(९) (अ) नुसार स्थानिक संस्था कर **अभय योजना-२०१५** अधिसूचना क्र.स्थासंक-२०१५/प्र.क्र.८२/२०१५ नवि-३२ दि.३ जून, २०१५ ने अधिसूचित केलेली आहे. सदर अभय योजनेतील सवलतीचा लाभ घेण्यासाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. ज्या व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था करांतर्गत अद्याप नोंदणी केलेली नसेल अशा व्यापाऱ्यांनी किंवा व्यक्तीनी प्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. त्यांनी करदायित्व ज्या दिनांकास आले त्या दिनांकापासून ३१ मार्च, २०१५ पर्यंतची विवरणे दाखल करुन त्यानुसार करभरणा करणे आवश्यक आहे.

३. अभय योजनेचा लाभ घेतल्यानंतर जर अपील पुनर्विलोकन किंवा रिट याचिका दाखल केली गेली तर, अभय योजनेअनुसार संबंधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.

४. अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक वर्षाकरीता स्वतंत्रपणे आवेदनपत्र महानगरपालिका आयुक्तांकडे सादर करणे आवश्यक असेल.

५. व्यापाऱ्याने जर अपील दाखल केले असेल तर तो असे अपील विनाशर्त मागे घेईल व त्याबद्दलचा पुरावा आवेदन पत्रासोबत जोडेल.

६. अभय योजनेखालील कर भरावयाची शेवटीची तारीख :- ३१ जुलै, २०१५

**स्पष्टीकरण:-** पात्र व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने दि.३१.०७.२०१५ नंतर विवरण दाखल करुन कर भरणा केल्यास त्याचा विचार त्या विशेष अभय योजने अंतर्गत केला जाणार नाही.

सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता संबंधित व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने विहीत नमुन्यात महानगरपालिकेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. सदर अर्जाचा नमुना सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

4.6.15
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.

## स्थानिक संस्था कर अभय योजना चलन/अर्जाचा नमुना

१. अर्जदाराचे नांव/पत्ता/दूरध्वनी क्रमांक/ई-मेल आयडी ---------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२. व्यापारी फर्मचे नांव व पत्ता ---------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३. व्यवसायाचे स्वरुप ---------------------------------------------------------
(उत्पादक/विक्रेता/इतर नमूद करावे)

४. नोंदणी केली असल्यास त्याबाबतचा तपशील ------------------------------------

५. कोणत्या कालावधीसाठी अभय योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे ते वित्तीय वर्ष -------
---------------------------------------------------------------------------

६. स्थानिक संस्था कराची थकबाकी भरल्याबाबतचा पुरावा म्हणून चलनाची प्रत
(प्रत संलग्न करावी) ----------------------------------------------------------

उपरोक्त चलन/अर्जामध्ये मी दिलेली सर्व माहिती अचूक असून पडताळणीअंती ती चुकीची/असत्य आढळून आल्यास अभय योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या सवलती काढून घेण्यास मी पात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक : -**

**अर्जदाराची सही**
**(नाव व पदनाम)**

**सहपत्र -:**

१. **वैधानिक आदेशाची प्रत**
२. **करभरणा केलेल्या चलनाची प्रत**
३. **कर निर्धारणा झाली नाही अशा प्रकरणातील विवरणपत्र/सुधारीत विवरणपत्राची प्रत**
४. **अपिल मागे घेतले असल्याची प्रत**